ईश्वर टी अॅण्ड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवय्यांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी, पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुण इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३२९ वा ● शुक्रवार, ता. १३ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## विमान अपघात नातेवाईकांसाठी राज्य शासनाची मदत सेवा सुरू

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडिया -१७१ या विमानाचा अपघात झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने तत्काळ पावले उचलत आपत्कालीन संचालन केंद्रामार्फत मदत व माहिती सेवा सुरू केली आहे. या दुर्घटनेत प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे नातेवाईक तसेच संबंधित नागरिकांसाठी शासनाने मदत कक्ष (हेल्पडेस्क) स्थापन केला आहे. या कक्षामार्फत अपघातग्रस्तांविषयीची माहिती व आवश्यक सहाय्य देण्यात येत आहे. संबंधितांनी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन प्रभागाचे संचालक सतीशकुमार खडके यांनी केले आहे.०२२-२२०२७९९०, ०२२-२२७९४२२९, ९३२१५८७१४३, १०७० (आपत्कालीन मदत क्रमांक) आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी व नातेवाईकांनी घाबरून न जाता या हेल्पलाईनवरून आवश्यक माहिती मिळवावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.





एकमात्र वाचलेला प्रवासी : रमेश कुमार विश्वास, सीट नंबर ११ A

# एअर इंडिया Flight AI 171 विमान दुर्घटना

## ए ११ सीटवरील प्रवासी बचावला, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

**अहमदाबाद । प्रतिनिधी**

गोवा येथून उड्डाण केलेले एअर इंडिया विमान अहमदाबादमध्ये दुर्घटनाग्रस्त झाले असून, या भीषण अपघातात एक प्रवासी चमत्कारिकरित्या बचावला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रवासी ११ या सीटवर होता. दुर्घटनेनंतर एका जखमी प्रवाशाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मृतांची नेमकी संख्या अद्याप स्पष्ट झालेली नसली तरी, विमान रहिवासी भागात कोसळल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अहमदाबाद पोलिस आयुक्त जी.एस. मल्लिक यांनी या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, ''विमानातील एक प्रवासी सापडला असून तो सध्या उपचाराधीन आहे. मृतांचा आकडा अद्याप निश्चित सांगता येत नाही, परंतु विमान रहिवासी परिसरात कोसळल्यामुळे मृतांची संख्या वाढू शकते.'' या अपघाताने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. आणखी माहितीची प्रतीक्षा आहे.



## आयपीएस बिरदेव डोणे यांना खा. शाहू महाराज यांचे आशिर्वाद

### यशाची वाटचाल प्रेरणादायी, न्यू पॅलेसमध्ये सन्मान

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

युपीएससी परीक्षेत ५५१ वा क्रमांक मिळवून आयपीएस पदाला गवसणी घालणारे यमगे (ता. कागल) गावचे सुपुत्र बिरदेव डोणे यांनी नुकतीच खासदार श्री शाहू छत्रपती महाराज यांची न्यू पॅलेस, कोल्हापूर येथे भेट घेतली. या भेटीदरम्यान खासदार शाहू महाराजांनी बिरदेव डोणे यांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेला शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, ''गावखेड्यातील युवक अशा शासकीय सेवेत यश मिळवत आहेत, ही गोष्ट अत्यंत अभिमानाची असून प्रेरणादायी आहे.'' या प्रसंगी बिरदेव डोणे यांच्यासोबत त्यांची मातोश्री बाळाबाई डोणे, बंधू वासुदेव डोणे, चंद्रकांत पुजारी, तसेच शाहीर विशारद डॉ. आझाद नायकवडी उपस्थित होते. बिरदेव डोणे यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरत असून, त्यांनी कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि चिकाटीच्या जोरावर ही घवघवीत कामगिरी साध्य केली आहे.




## खऱ्या सावित्रीच्या लेकींनी वडाच्या झाडाला दिला 'मुक्त श्वास'

**पुणे । प्रतिनिधी**

परंपरेच्या बडग्यात अडकलेल्या सणांना नव्याने समजून घेण्याचा स्तुत्य प्रयत्न पुण्यातील काही संवेदनशील महिलांनी केला. वटपौर्णिमेनंतर त्यांनी एका वडाच्या झाडावर बांधलेले दोरे स्वतःच्या इच्छेने काढून टाकत त्याला ''मुक्त श्वास'' दिला. ''वर्षानुवर्षे ऑक्सिजन देणाऱ्या झाडांभोवती आपण दोऱ्यांचे फास घालतो, पण त्या झाडांचा श्वास कुणी विचारतं का?'' असा सवाल करत अॅड. शैलजा मोळक यांनी पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश दिला. त्या म्हणतात, ''वडाच्या झाडाला दिवे लावताना त्याच्या पारंब्याही पेट घेतात, पूजा साहित्य, ब्लाऊजपीस, पुरणपोळ्या वाया घालवल्या जातात. लाखोंची उलाढाल होते, पण कोणाचं पोट भरत नाही.'' या कर्मकांडामागील विचार तपासण्याचा त्यांनी आग्रह धरला आहे. ''पुढील जन्मात हाच पती मिळावा, म्हणून व्रत करणाऱ्या महिला त्या पतीचं अस्तित्व हरवल्यावर काय करावं? जन्म परत येतो की नाही, हेच माहित नाही, मग हा आंधळा विश्वास का?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या स्त्रियांनी एकत्र येऊन झाड मुक्त करत, पर्यावरण व श्रद्धा यामध्ये संतुलन साधण्याचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या कृतीतून महिलांनी खऱ्या अर्थाने ''सावित्रीच्या लेकी'' असल्याचं सिद्ध केलं असून, सण साजरे करताना पर्यावरणाची काळजी कशी घ्यावी याचा विचार आता समाजानेही करायला हवा.

## मतदार यादीतील आरोपांवर निवडणूक आयोगाची भूमिका

### काँग्रेसच्या दाव्यांना दिले वस्तुनिष्ठ उत्तर ?

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसंदर्भात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने (INC) केलेल्या काही आरोपांवर भारत निवडणूक आयोगाने आणि राज्य निवडणूक यंत्रणेने अधिकृत स्पष्टीकरण देत वस्तुस्थिती मांडली आहे. काँग्रेसने आपल्या एका प्रसारमाध्यमातील लेखामधून मतदार याद्यांमध्ये अनियमितता असल्याचा आरोप केला होता, त्यावर आयोगाने आधीच २४ डिसेंबर २०२४ रोजी सविस्तर उत्तर दिले असून, त्यानंतर पुन्हा काही बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. मतदार यादी कशी तयार होते? मतदार नोंदणी ही केंद्रस्तरीय नसून, लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० आणि मतदार नोंदणी नियम १९६० नुसार, महाराष्ट्रातील २८८ मतदार नोंदणी अधिकारी (EROs) आणि सुमारे एक लाख BLO (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी) यांच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पारदर्शक प्रक्रियेतून केली जाते. यामध्ये सर्व मान्यताप्राप्त पक्षांना दावे, हरकती नोंदविण्यासाठी संधी दिली जाते. मतदार वाढीबाबत तथ्य काय सांगते? काँग्रेसच्या लेखात मतदारसंख्येतील वाढीबाबत केलेले दावे दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्ट करताना आयोगाने खालील आकडेवारी दिली: २०१९ विधानसभा ते २०२४ लोकसभा दरम्यान: १.३९ कोटी नावे समाविष्ट आणि १.०७ कोटी वगळण्यात आली. त्यामुळे निव्वळ वाढ: ३२.२५ लाख २०२४ लोकसभा ते २०२४ विधानसभा दरम्यान: ४८.८२ लाख नवे मतदार, ८ लाख वगळणी, निव्वळ वाढ: ४०.८१ लाख, त्यात १८-२९ वयोगटातील २६ लाख नव मतदार काँग्रेसचे सहभागी BLA होतेच मतदार याद्यांच्या पुनरिक्षण प्रक्रियेत काँग्रेसचे २८,४२१ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA) सहभागी होते. निवडणूक होईपर्यंत त्यांनी कोणतीही गंभीर तक्रार नोंदवलेली नव्हती. निवडणुकीनंतरच हे मुद्दे उभे करण्यात आल्याची नोंद निवडणूकयंत्रणेकडून घेण्यात आली आहे. मतदार यादी सर्वांसाठी उपलब्ध मतदार याद्यांच्या सॉफ्ट व हार्ड कॉपी २०२४ विधानसभा निवडणुकीसाठी आयोगाने सर्व पक्षांना उपलब्ध करून दिल्या होत्या. याशिवाय, कोणत्याही व्यक्तीस नियमानुसार संबंधित जिल्हाधिकारीकडून शुल्क भरून प्रत मिळवता येते. यासंदर्भात २२ मे २०२५ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी काँग्रेसच्या खासदारांना उत्तर देताना ही बाब स्पष्ट केली होती. आयोगाचा निष्कर्ष स्पष्ट लोकसंख्येच्या फक्त अंदाजावरून मतदार याद्यांतील नावे जास्त असल्याचा आरोप ग्राह्य धरता येत नाही. यादीतील प्रत्येक समावेश वा वगळणी ही वैयक्तिक अर्जावर आधारित असते आणि त्यावर कायद्याच्या तरतुदीप्रमाणे निर्णय घेतले जातात. निवडणूक आयोगाची स्पष्ट भूमिका ही निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर शिक्कामोर्तब करणारी आहे. जनतेच्या आणि सर्व राजकीय पक्षांच्या सहभागातूनच मतदार याद्यांचे पुनरिक्षण व अद्ययावत प्रक्रिया पार पडत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात आले आहे.



# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन आढावा बैठक

## स्वतंत्र धोरण तयार करण्याचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**


सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झोपुप्रा) संदर्भातील महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, झोपुप्राचे सीईओ महेंद्र कल्याणकर आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी, ''मुंबईसह इतर महानगरांतील डोंगरावरील झोपडपट्ट्यांना पावसाळ्यात भूस्खलन व दरड कोसळण्याचा धोका असल्याने अशा भागांतील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन तातडीने व्हावे. त्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात यावे,'' असे निर्देश दिले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ''पात्र झोपडीधारकांना त्यांच्या सध्याच्या राहत्या जागेच्या नजीकच प्रशस्त व सुरक्षित घरे द्यावीत, जेणेकरून त्यांच्या जीवनात स्थैर्य व सकारात्मक बदल घडेल.'' तसेच, प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर सर्व आवश्यक माहिती खुलेपणाने उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागण्याची वेळच येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देत, फडणवीस यांनी अहमदाबादच्या भास्कराचार्य संस्थेच्या मदतीने एमआरसॅकच्या सहकार्याने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अतिक्रमण अलर्ट प्रणाली विकसित करण्याचे आदेश दिले. ही प्रणाली कांदळवन अतिक्रमणासाठीही वापरता येईल आणि ती पीएम गतिशक्ती पोर्टलशी जोडलेली असावी, असे निर्देश देण्यात आले. मुंबई महानगर प्रदेशातील घरांच्या सर्वेक्षणासाठी बायोमेट्रिक पद्धतीचा वापर करत सर्वेक्षण डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करावे. बंद झोपड्यांची नोंद घेऊन त्या रेकॉर्डवर आणाव्यात. रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प गतीने पूर्ण करावा, तसेच समुद्रकाठच्या जागांचा पुनर्वसनासाठी प्रभावी वापर करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. बैठकीदरम्यान झोपुप्राचे नवीन मोबाईल अॅप आणि माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. या निर्णयांमुळे महानगरांतील झोपडपट्ट्यांचे नियोजनबद्ध पुनर्वसन अधिक गती घेईल आणि झोपडपट्टीवासीयांना सुरक्षित व सुसज्ज निवास मिळवण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# मोडी लिपी शिका, ऐतिहासिक दस्तऐवजांचे दार उघडा

## इतिहास विभागात १ जुलैपासून विशेष अभ्यासक्रमाची सुरुवात

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात 'मोडी लिपी आणि कागदपत्रांचा चिकित्सक अभ्यास' या विशेष पायाभूत अभ्यासक्रमाची सुरुवात १ जुलै २०२५ पासून होत आहे. ऐतिहासिक दस्तऐवजांच्या वाचनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा हा अभ्यासक्रम मराठी भाषेत आणि संध्याकाळी ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार असून, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी तो खुला आहे. या अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन डॉ. गिरीश मांडके हे करणार आहेत. वर्ग सोमवारी, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी संध्याकाळी ७ ते ८.३० या वेळेत ऑनलाइन पद्धतीने घेतले जातील. अभ्यासक्रमाची मुदत ६० तासांची असून एकूण ६० विद्यार्थ्यांसाठीच प्रवेश खुला आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वाचा अवलंब करण्यात येणार आहे.





**शुल्क आणि प्रवेश प्रक्रिया :** अभ्यासक्रमासाठी शुल्क ५,००० रुपये असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख २३ जून २०२५ आहे. इच्छुकांनी आपला प्रवेश अर्ज, फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत इतिहास विभागात प्रत्यक्ष येऊन अर्ज सादर करावा. पात्र अर्जदारांना लगेच शुल्क भरण्याची संधी दिली जाईल. परीक्षा मात्र ऑफलाइन पद्धतीने इतिहास विभागात घेतली जाईल.

**अभ्यासक्रमाचे मुख्य मुद्दे :** मोडी लिपीची पूर्वपीठिका. वर्णमाला, बाराखड्या, संयुक्त अक्षरे. लेखन-वाचन सराव. ऐतिहासिक लेखन व कालगणना. महसूल, न्याय, राजकारण, अर्थव्यवस्था या विषयांवरील कागदपत्रांचे विश्लेषण. प्राचीन हिशेब, वजने व मापांची ओळख. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना केवळ मोडी लिपी शिकवली जाणार नाही, तर ऐतिहासिक कागदपत्रांचे चिकित्सक विश्लेषण करण्याची कौशल्येही दिली जाणार आहेत. डॉ. श्रद्धा कुंभोजकर (विभागप्रमुख) आणि डॉ. बाबासाहेब दुधभाते (समन्वयक) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ज्यांना इतिहास आणि मोडी लिपीमध्ये रस आहे, त्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे.

# स्व.शंकरराव घुले यांचे कार्य राज्याला दिशादर्शक- आ. जगताप

## स्व. शंकरराव घुले जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**अहमदनगर । प्रतिनिधी**

कष्टकाऱ्यांचे जीवनमान उंचविण्याचे काम स्व. शंकरराव घुले यांनी केले. त्यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी मोठे आंदोलन उभे करुन त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. त्यांच्या आंदोलनामुळे कष्टकऱ्यांसाठीच्या अनेक सरकारी योजना प्रत्यक्षात अंमलात आल्या. आपले हक्क मिळवयाचे असेल तर संघटन हे महत्वाचे हे ओळखून त्यांनी राज्यभरातील कष्टकऱ्यांसाठी मौलिक काम केले आहे. कॉ.बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. घुले यांनी कष्टकऱ्यांचे मोठे संघटन उभे करुन कष्टकऱ्यांना न्याय मिळवून दिला. स्व.घुले यांची उणिव आजही संघटनेस भासत आहे. त्यांचे कार्य आज जिल्हा हमाल पंचायत चे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून , नगरची कष्टकऱ्यांची संघटना राज्याला दिशादर्शक असेच काम करत आहेत. कष्टकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच त्यांचा पाठपुरावा असतो असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. कष्टकाऱ्यांचे नेते माजी नगराध्यक्ष स्व.शंकरराव घुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा हमाल पंचायत येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले . याप्रसंगी पदमश्री पोपट पवार, हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले ,जि.प. माजी अध्यक्ष अरुण कडू, राजकुमार घायाळ, पतसंस्थेचे चेअरमन रविंद्र भोसले, हमाल पंचायतचे उपाध्यक्ष गोविंद सांगळे, मधुकर केकाण, कॉ. बाबा आरगडे, ज्ञानदेव पांडूळे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. वैभव कदम, विष्णूपंत म्हस्के, अशोक सब्बन, अनंत लोखंडे, शरद अरगडे, बाळासाहेब वडागळे, पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन नवनाथ बडे, तज्ञ संचालक संजय घुले, संचालक सुरेश मोहिते, आदिनाथ चेके, मच्छिंद्र दहिफळे, दिगंबर सोनवणे, लक्ष्मण वायभासे, सागर पोळ, मंदाबाई सुर्यवंशी, रत्नाबाई आजबे, राम सरोदे, संजय महापुरे आदि उपस्थित होते. याप्रसंगी अविनाश पाटील म्हणाले, स्व.शंकरराव घुले यांचे कष्टकरी, सर्वसामान्यांप्रती असलेले योगदान खूप मोठे आहे. समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या कार्यातही ते सक्रिय असत. प्रास्तविक अविनाश घुले म्हणाले, हमाल पंचायतीच्या माध्यमातून कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम स्व.शंकरराव घुले यांनी केले. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सरकारच्या योजना कष्टकऱ्यांपर्यंत पोहचल्या. कष्टकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देत त्यांची पतनिर्माण करण्याचे काम केले. कष्टकाऱ्यांच्या पाठिवरील ओझे कमी करण्याबरोबरच त्यांचे आरोग्य आबाधित राहण्यासाठी हॉस्पिटल, आर्थिक उन्नत्तीसाठी पतसंस्था, गुणवंत पाल्यांना प्रोत्साहन अशा अनेक उपक्रमांमुळे खऱ्या अर्थाने कष्टकऱ्यांना न्याय मिळाला आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय गुणवंत कामगारांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा उचित सन्मान केला जात आहे. त्यामुळे कष्टकऱ्यांमधील आत्मविश्वास वाढण्यास मदत होत आहे. यानिमित्त त्यांचे कार्य कायम स्मरणात राहील, असे सांगितले. सूत्रसंचालन शर्मिला गोसावी व संजय महापुरे यांनी केले तर आभार रविंद्र भोसले यांनी मानले. या डॉ.विजय कवळे, नंदू डहाणे, बबन आजबे, सचिन ठुबे, सुनिल गोसावी, तारकराम झावरे, सतीश शेळके ,सुधीर टोकेकर ,बन्सी सातपुते ,राजेंद्र उदागे ,आदिंसह कष्टकरी, हमाल-मापाडी, माथाडी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.









नगर शहरात रात्री झालेल्या वादळी वारे आणि पावसामुळे शहराला झोडपले. १) उपनगरातील बोल्हेगाव गावठाण येथील वडाचे झाड उन्मळून विजेच्या तारांवर पडले, त्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला. २) झोपडी कॅन्टीन परिसरात दुकानाचे फ्लेक्स पडले. ३) कोठला या ठिकाणी झाड रिक्षावर पडले. ४) सीएसआरडी महाविद्यालयात झाडाची पडलेली फांदी.



# वृक्ष लागवड मोहीम लोकचळवळ म्हणून राबवा- जिल्हाधिकारी डॉ. आशिया

## अभियानांतर्गत वृक्ष लागवडीचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत चालू वर्षात राज्यात १० कोटी वृक्ष लागवड मोहीम राबविण्याच्या शासनाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करत ही मोहीम लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्ष लागवडी संदर्भात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, विभागीय वन अधिकारी, सचिन कंद, पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, डॉ. एस.के.बांगर, जयहिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतूबदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या वृक्ष लागवडीमध्ये जिल्ह्याचा सहभाग अधिक प्रमाणात रहावा, यादृष्टीने वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात यावे.

जिल्ह्यात शाळांच्या आवारामध्ये उपलब्ध जागेनुसार वृक्ष लागवड करावी. पाण्याच्या उपलब्धतेनुसार मियावाकीसारखे प्रयोग अंमलात आणावेत. बांधावर वृक्षे लावण्याबरोबरच तुतीची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात यावी. वृक्ष लागवडीच्या कामांमध्ये शहरी भागांमध्ये माजी सैनिकांचा सहभाग घेण्याबरोबरच एनजीओ, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्यांनाही या उपक्रमामध्ये सहभागी करुन घेण्यात यावे. वृक्षांची केवळ लागवड न करता वृक्षांच्या संगोपन होण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात यावे. सामाजिक वनीकरण विभाग तसेच इतर नर्सरीमधून रोपे उपलब्धतेचे नियोजन करावे. वृक्ष लागवडीचे जिओटॅग छायाचित्र काढून ते वनविभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या. उपवनसंरक्षक सालविठ्ठल म्हणाले, शासनामार्फत दरवर्षी ही मोहिम आयोजित करण्यात येणार आहे. वृक्ष लागवडीसाठी प्रत्येक विभागाने लागवडीचे क्षेत्र व रोपाचे नियोजन करावे. पावसाळा सुरु झाला असून वृक्षांची लागवड तातडीने करण्याची गरज आहे. वृक्ष लागवडीसदंर्भात तांत्रिक मदतीसाठी वनीकरण विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्यलेखन पुरस्कार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील केडगाव परिसरातील कवी सुभद्रासुत आंधळे यांच्या 'मायबाप विद्यापीठ' या वास्तववादी काव्यसंग्रहास डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्यलेखन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे पार पडलेल्या विशेष समारंभात त्यांना सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार संत गाडगे महाराज विचार मंच, ओतूर आणि ज्ञानज्योत फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य, मांजरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्धापन दिन विशेष कार्यक्रमात दिला गेला. २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या विविध साहित्यकृतींमधून 'मायबाप विद्यापीठ' या काव्यसंग्रहाची काव्यप्रकारात निवड करण्यात आली. पुरस्कार वितरण समारंभ शनिवार, ता. ७ जून २०२५ रोजी पुण्यातील वेदशास्त्रोत्तेजक सभागृह, सदाशिव पेठ येथे पार पडला. यावेळी कवी सुभद्रासुत आंधळे यांना त्यांच्या कन्या शितल आंधळे यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि काव्यसंग्रहाची प्रत प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्ष 'जग बदलणारा बापमाणूस' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक जगदीश ओहोळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत पडवळ यांची उपस्थिती लाभली होती, तर उद्घाटन इंदू फार्मा, पुणेचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे यांच्या हस्ते झाले. 'मायबाप विद्यापीठ' हा कवी सुभद्रासुत यांचा चौथा काव्यसंग्रह असून, अष्टाक्षरी छंदात रचलेला हा ग्रंथ शॉपिझन डॉट ईन प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला आहे. कार्यक्रमाचे नियोजन संत गाडगे महाराज विचारमंचचे संस्थापक कार्याध्यक्ष रणजीत पवार, अध्यक्ष खं. र. माळवे, तसेच ज्ञानज्योत फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा कविता काळे, कार्याध्यक्षा कांचन मून आणि मार्गदर्शक रघुनाथ कांबळे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले.



# सपाचे पुरातत्व विभाग कार्यालयात ठिय्या आंदोलन

**अहमदनगर । आबीद खान**

अहमदनगर शहरातील ऐतिहासिक वारसा नष्ट होत असून, पुरातत्व विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे, असा आरोप समाजवादी पार्टीने केला आहे. यासंदर्भात ३ जून रोजी समाजवादी पार्टीने निवेदन दिले होते. मात्र, योग्य ती कारवाई न झाल्यामुळे ता. १२ जून रोजी पुरातत्व विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. समाजवादी पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष आबीद हुसैन यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी पुरातत्व विभागाने कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. नगर शहराचे संस्थापक यांच्या मजारकडे जाणारा रस्तादेखील बंद अवस्थेत आहे, तर काही वास्तूंच्या उद्ध्वस्त होण्याची वाट पाहिली जात आहे, असा आरोप त्यांनी केला. पुरातत्व विभागाकडून या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष होत असून, वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याने समाजवादी पार्टीने आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पुढील काळात जर अद्यापही संबंधित ऐतिहासिक वास्तूंच्या जतनासाठी ठोस कारवाई झाली नाही, तर पुरातत्व विभागाच्या कार्यालयास टाळे ठोकण्याचा आणि अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा समाजवादी पक्षाने दिला आहे. या दरम्यान, पुरातत्व विभाग औरंगाबादकडून समाजवादी पार्टीच्या प्रतिनिधींना एक पत्र प्राप्त झाले असून, त्यामध्ये संबंधित जागा मिळाल्यास पुढील काम हाती घेतले जाईल, तसेच नेअमत ख्वानी महालच्या कामालाही गती दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. या आंदोलनात आसिफ रजा, अल्ताफ लकडावाला, तन्वीर सय्यद, गनी राज, मतीन खान, एजाज हाजी, तन्वीर बागबान, रफिक बाबुलाल, मुनीर शेख, कलीम शेख, सैयद खान, रशीद कुरेशी, सैमी अहमद, सरफराज शेख, समीर बिल्डर यांच्यासह पक्षाचे अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

**जगदंबा टी सेंटर**

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# नुकसानग्रस्तांना शासनाच्या माध्यमातुन योग्य ती मदत करणार- आमदार राजळे

**शेवगांव । लक्ष्मण मडके**

शेवगांव व पाथर्डी तालुक्यात वादळी वाऱ्यांमुळे नागरिकांच्या घरांचे , मालमत्तेचे तसेच फळपिकांचे, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या वादळी वाऱ्यांमुळे झालेल्या नुकसानीचे प्रत्यक्ष पंचनामे करून तात्काळ आपद्ग्रस्तांना मदत करण्याच्या सुचना आमदार मोनिकाताई राजळे यांनी तहसीलदार तसेच संबधीत अधिकाऱ्यांना दिल्या. जिवितहानी झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना तसेच नुकसानग्रस्तांना शासनाच्या माध्यमातुन योग्य ती मदत करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

बुधवार ता. ११ जुन रोजी शेवगांव व पाथर्डी तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने बहुतांशी ठिकाणी शेतकरी यांच्या पिकांचे व घरांचे नुकसान झाले आहे,या वादळात अंगावर झाड पडल्याने दहिफळ येथील एका महिलेचा मृत्यु झाला तर तिघे जखमी झाले आहेत.विद्युत विभागाने वादळग्रस्त भागातील पडलेले विद्युत खांब, विद्युत रोहित्राची (डीपी) त्वरित दुरूस्ती करावी. नुकसानग्रस्त भागात घरावर, गोठ्यावर झाडे पडल्याने मोठे नुकसान झालेले आहे, वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या



पीकाचे नुकसान झाले असुन विशेषत: केळी पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान नुकसान झाले आहे.

यासंदर्भात नुकसानीचे सर्व्हेक्षण करून पंचनामे करावे व नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याचे आदेश यावेळी आमदार राजळे यांनी दिले आहेत. शेवगांव तालुक्यातील दहिगांव ने, रांजणी, भावीनिमगांव, मठाचीवाडी, शहरटाकळी, मजलेशहर, भायगांव या गावाची नुकसानीची पाहणी आमदार मोनिका राजळे यांनी आज केली. यावेळी प्रभारी तहसीलदार दिपक कारखेले, तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, विद्युत वितरणचे अभियंता दिवेकर, संबधीत अधिकारी कर्मचारी उपस्थित होते तसेच भाजपाचे जेष्ठ नेते वाय.डी. कोल्हे, संदीप खरड, ताराचंद लोढे, कल्याण जगदाळे, अनिल सुपेकर, रामा मुंगसे, लक्ष्मण काशिद, बशीर पठाण, आसाराम नऱ्हे, शरद थोटे, आप्पासाहेब सुकासे, मोहनराव लोढे, नवनाथ फासाटे, संतोष आढाव, सुरेश बडे, अशोक देशपांडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**काल झालेल्या अचानक मोठ्या वादळ आणि पावसामुळे शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची धांदल उडाली. जास्त प्रमाणात वारा असल्याने ऊस,आंबा, केळी, पपई या पिकाचे मोठे नुकसान झाले. तसेच साठवणुकीसाठी ठेवलेल्या कांद्यावर मोठ्या प्रमाणात वाऱ्याच्या वेगामुळे ताडपत्री फाटल्यामुळे काही ठिकाणी कांद्याच्या चाळीमध्ये पाणी घुसले तर काही ठिकाणी अचानक वादळ व पावसामुळे घराचे मोठे नुकसान झाले. तरी तालुक्यातील पिकांसह घराचे पंचनामे करून तातडीने आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देणे गरजेचे आहे.**

**– बाळासाहेब फटांगडे,** जिल्हा सरचिटणीस, स्वाभिमानी शेतकरी संघटना

# राम मंदिराच्या नावाखाली जागा बळकावण्याचा प्रयत्न, बापू माने यांचा आरोप

## जमीन बळकावण्याचा डाव

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहरातील गट नंबर ११२१ मधील जमिनीवर वाद निर्माण झाला असून, सामाजिक कार्यकर्ते बापू माने यांनी नंदकुमार ताडे यांच्यावर गंभीर आरोप करत म्हटले की, राम मंदिराच्या नावाखाली जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. या संदर्भात शहरात पत्रकार परिषद घेण्यात आली. चंद्रनंदन ताडे यांनी यावेळी स्पष्ट केले की, गट नं. ११२१ ही जमीन त्यांच्या पूर्वज धाकू सखाराम ताडे यांनी १९१९ साली खरेदी केली होती.

खरेदीखतातील माहिती व वंशावळीनुसार तेच या जमिनीचे कायदेशीर वारस आहेत. मात्र नंदकुमार ताडे हे दिशाभूल करत असून, त्यांनी बनावट कागदपत्रांद्वारे स्वत:चा उतारा तयार करून जमीन आपल्या नावावर घेतल्याचा आरोप त्यांनी केला. ''धोंडीबा ताडे हे नंदकुमार ताडेंचे आजोबा होते. परंतु धाकोजी हे माझे खापरपणजोबा होते, हे खोटे दाखवून नंदू ताडे यांनी बनावट वारस दाखवले.

त्यांच्या चुलत बहिणीच्या मृत्यूनंतर तिच्या वारसांना डावलून, स्वत:चे नाव खोट्या पद्धतीने कागदांमध्ये दाखवले,'' असे चंद्रनंदन ताडे यांनी सांगितले. बापू माने यांनीदेखील स्पष्ट केले की, मंदिराच्या जागेची (सि.स.नं. २०४८) कोणतीही खरेदी



त्यांनी केलेली नाही. ''राम मंदिराची जागा बळकावण्यासाठी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लेटरपॅडचा गैरवापर करून तहसीलदारांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, अन्यथा आझाद मैदानावर उपोषण करू,'' असा इशारा त्यांनी दिला.मंदिराची जागा व शेती जमीन यांचे खरेदीखत व सीमारेषा स्पष्टपणे वेगळ्या असून, नंदकुमार ताडे हे या बाबींचा गैरफायदा घेत भावनिकता व धर्माच्या नावाखाली मालकीचा दावा करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रकरण गंभीर असून दस्तऐवज, वंशावळ व प्रत्यक्ष खरेदीखतांची चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी चंद्रनंदन ताडे आणि बापू माने यांनी केली आहे. प्रशासनाने याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# बेलापूर एज्युकेशन सोसायटीचा वाद चव्हाट्यावर

## सोमाणी विरोधात सिकची यांची तक्रार नोंदवा, पोलिसांना आदेश

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शरद रामविलास सोमानी व सुविद्या सुविजय सोमानी यांनी बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव या नावाने १८ जून रोजी वार्षिक सभा असल्याने झवर ट्रस्टने प्रतिनिधीचे नाव कळवावे, अशी बनावट कागदपत्रे तयार केली, या विरोधात राजेंद्र सिकची यांनी अगोदर पोलिसात आणि त्यानंतर न्यायालयात तक्रार दाखल केली होती. सोमाणी विरोधात फिर्यात दाखल करून घेण्याचा आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले आहे. बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे ट्रस्टी बन्सीलाल रघुनाथदास झंवर हे चॅरिटेबल ट्रस्टी मयत आहेत. १९६९ पासून हा ट्रस्ट कार्यान्वित नाही. शरद रामविलास सोमानी व सुविद्या सुविजय सोमानी हे या ट्रस्ट वर बेकायदेशीर काम करत आहेत. त्यांच्याविरुद्ध कलम १९१,१९३, १९९, २००, ४६५, ४६७, ४०६, ४२०, ३४ नुसार तपास करून गुन्हा दाखल करावा, असा आदेश श्रीरामपूर न्यायालयाने पोलिसांना दिला आहे. याबाबत राजेंद्र मदनलाल सिकची यांनी श्रीरामपूर न्यायालयात याचिका दाखल केली होती. राजेंद्र सिकची यांनी श्रीरामपूर पोलीस व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार दिली होती. मात्र त्यांनी या बाबीची दखल घेतली नाही. त्यानंतर सिकची यांनी श्रीरामपूर न्यायालयात याचिका दाखल केली. याचिकेची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने सिकची यांची तक्रार नोंदवून घेण्याबाबत पोलिसांना आदेश दिले आहेत. बन्सीलाल रघुनाथदास झवर चॅरिटेबल ट्रस्टचें ट्रस्टी रामनारायण रघुनाथदास झंवर अजितकुमार रघुनाथदास झवर, जवाहर बन्सीलाल झवर, अयोध्याबाई रामनारायण झवर हे मयत असून नवीन ट्रस्टबाबत कुठलीही कारवाई झाली नाही. ट्रस्ट १९६९ सालापासून बंद असल्याचे चॅरिटी कमिशनर यांनी सांगितले आहे. तरीही हे ट्रस्टी हयात असल्याचे दाखवून शरद रामविलास सोमानी व सुविद्या सुविजय सोमानी यांनी बनावट कागदपत्रे तयार करून २५ मे रोजी बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव या नावाने १८ जून रोजी वार्षिक सभा असल्याने झवर ट्रस्टने प्रतिनिधीचे नाव कळवावे, असे कळविले. ही सर्व बनावट कागदपत्रे असल्याने सोमानी यांनी चॅरिटी कमिशनर यांची ही सुद्धा फसवणूक केली आहे. सिकची यांच्या फिर्यादीची न्यायलयाने दखल घेतली असून पोलीसांनी कलम १५६(३) अन्वये फिर्याद नोंदवून घेणे बाबत १ एप्रिल रोजी पोलिसांना आदेश दिले आहेत.

**दरम्यान, बेलापूर एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या वादाचा मुद्दा पुन्हा एकदा एरणीवर आला आहे. पदाधिकाऱ्यांच्या सुंदो पसुंदीचा शाप या संस्थेला गेल्या अनेक वर्षापासून लागलेला आहे. तो आजही कायम आहे. सिकची यांच्या तक्रारीमुळे यापुढे बेलापूर एज्युकेशन संस्था पदाधिकाऱ्यांमधील अंतर्गत कलह यापुढेही रंगणार आहे.**

# निंबळक-नागापूर रस्त्याची दुरावस्था

## ८ दिवसांत काम सुरू न झाल्यास रास्तारोकोचा इशारा

**नगर तालुका । प्रतिनिधी**

नगर-मनमाड मार्गावरील नागापूर चौक येथील सन फार्मा कंपनीपासून ते निंबळक हद्दीतील अपोलो कंपनीपर्यंतच्या रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, सद्यस्थितीत या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण वाढले असून, तात्काळ काम सुरु करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता संदीप बडगे यांच्याकडे निवेदन सादर केले. या रस्त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन अनेक दिवस उलटले असूनही अद्याप



ठेकेदार नेमण्यात आलेला नाही, यामुळे कामास विलंब होत असून नागरिकांचे हाल वाढले आहेत. दररोज हजारो वाहनांची व नागरिकांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. येत्या आठ दिवसांत रस्त्याचे काम सुरू न झाल्यास शनिवार ता. २१ जून रोजी नागापूर-नगर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस प्रशासनच जबाबदार राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी अप्पासाहेब सप्रे, ग्रामपंचायत सदस्य संजय भोर, महादेव सप्रे, नवनाथ काळे, शिवाजी दिवटे, दत्तुमामा दिवटे, छबुराव गायकवाड, बाळासाहेब कोतकर, अनिल पवार, निलेश पाडळे, रोहिदास केदार, प्रदीप बोबडे आदी उपस्थित होते.

# वारकऱ्यांसाठी वॉटरप्रूफ मंडप, पाणी, शौचालय व वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार- पालकमंत्री विखे

**शिर्डी । प्रतिनिधी**

आषाढी यात्रेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून मार्गस्थ होणाऱ्या पालख्यांसोबत असलेल्या वारकऱ्यांच्या विविध सुविधांसाठी राज्य सरकारने जिल्ह्यासाठी २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध होणार असून, यातून वॉटरप्रूफ मंडप, शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा व ग्रामपंचायत सहाय्य अनुदान यांचा समावेश असेल. जिल्ह्यातून दरवर्षी पैठण येथील संत एकनाथ महाराज, त्र्यंबकेश्वर येथील संत निवृतीनाथ महाराज, पिंपळनेर येथील संत निळोबाराय महाराज यांच्या प्रमुख पालख्यांसह सुमारे १६० स्थानिक पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. या यात्रेत महिला व पुरुष वारकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असते. त्यांच्या प्रवासादरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मागील दोन वर्षांपासून पालकमंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने जिल्हा प्रशासनाकडून नियोजन केले जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री विखे यांच्या अध्यक्षतेखाली पालखी नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस वरिष्ठ अधिकारी, प्रमुख देवस्थानांचे प्रतिनिधी, दिंड्यांचे प्रमुख उपस्थित होते. पालखी मार्गावरील अडचणी जाणून घेत प्रशासनाने सर्व सुविधा वेळेत पुरवण्याचे आश्वासन दिले. यासाठी विविध विभागांचे अधिकारी समन्वयक म्हणून काम करणार आहेत. अहील्यानगर जिल्ह्याने सुरू केलेला हा पॅटर्न संपूर्ण राज्यात आदर्श मानला जात असून, सोलापूर जिल्ह्यातही याच धर्तीवर नियोजन सुरू झाले आहे. पावसाळ्यातील मुक्कामांदरम्यान वॉटरप्रूफ मंडपांची गरज, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छतागृहे, वैद्यकीय सुविधा व पिण्याच्या पाण्याच्या अडचणी वारकऱ्यांनी अधोरेखित केल्या. यावर तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्री विखे पाटील यांनी संबंधित प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर त्यांनी पाठपुरावा करून ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. या निधीतून सर्व पालखी मार्गांवर सुविधा पुरवण्यासाठी तातडीने कार्यवाहीचे आदेशही पालकमंत्र्यांनी प्रशासनास दिले आहेत.


# श्रीरामपूरचे मुख्याधिकारी घोलप यांच्या विरोधात नागरिकांत असंतोष

## दूषित पाणी,सर्वत्र अतिक्रमणे, कचऱ्याचे ढीग, स्वच्छतागृहांची दुरावस्था

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शहरातील नागरिकांना नागरी सुविधा देण्याची जबाबदारी नगरपालिकेचे असताना त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. नागरिकांना सातत्याने दूषित पाणीपुरवठा होत आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहाची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. चौका चौकात भाजीपाला विक्रेत्यांची बेकायदेशीर दुकाने सुरू आहेत. नगरपालिका प्रशासन नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असून नागरिकांना साथीच्या आजाराचा सामना अटळ आहे. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप हेच या सर्व बाबीस जबाबदार आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी श्रीरामपूर नगरपालिकेच्या नागरी सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करावी तसेच पालिका नागरिकांना जे पाणी पिण्यासाठी देते, याची चव घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. ज्या प्रवरा कालव्यातून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावात पाणी घेतले जाते, या पाईपलाईन वर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झालेली आहेत, काही लोकांनी पक्के घरे बांधलेली आहे, अशा सर्व घरातील सांडपाण्यासह स्वच्छतागृहाचे पाणी पाईपला मोठे छिद्र पाडून सोडण्यात आले आहे. गेल्या अनेक महिन्यापासून नागरिक याविषयी तक्रारी करीत आहेत. परंतु नगरपालिका त्याची दखल घेत नाही. पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावत मोठ्या प्रमाणावर घाण सासलेली आहे. यापूर्वी या तलावात मेलेले जनावरे सापडले होते, जिल्हाधिकारी यांनी नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याचा आदेश दिलेला असतानाही श्रीरामपूर नगरपालिका दररोज अशुद्ध व स्वच्छतागृहाचे पाणी नागरिकांना देत आहे. याबाबत नागरिकात प्रचंड असंतोष आहे. मोरगे वस्तीसह शहरातील विविध भागात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झालेली आहे. अनेक स्वच्छतागृहांचे दरवाजे गायब आहेत. त्या ठिकाणी पाण्याची सोय नाही. स्वच्छतागृहाची नियमित साफसफाई होत नाही. स्वच्छतागृहात जाण्यासाठी रस्ता नाही, काही ठिकानीं असलेल्या स्वच्छतागृहाच्या छतावर तर मोठमोठे झाडे उगली आहेत. शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे. स्वच्छतेच्या कामावर नगरपालिका कोट्यावधी रुपये खर्च केल्याचे दाखवतात पण प्रत्यक्षात नागरिकांना स्वच्छतेबाबतची कुठलीही सुविधा मिळत नाही.ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या मुख्या धिकारी घोलप यांना बडतर्फ करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. श्रीरामपूर शहरात मोठा गाजावाजा करून अतिक्रमणे काढण्यात आली, या अतिक्रमण मोहिमेची इतिहासात नोंद झाली. ज्या ठिकाणी अतिक्रमणे काढण्यात आली त्या ठिकाणी पुन्हा नव्या जोमाने अतिक्रमणे झाली, मुख्याधिकारी घोलप यांनी पुन्हा अतिक्रमण झाले तर गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला होता, या ठिकाणी पुन्हा वीज पुरवठा देण्याबाबत नगरपालिका एनओसी देणार नाही, असे ठणकाऊन सांगत होते, परंतु अशा अतिक्रमण धारकांना पुन्हा पालिकेनेच पुन्हा परवानगी दिली. गुरुनानक मार्केट नेहमीप्रमाणे दहा फुटाचे होणार, असे सांगण्यात आले परंतु या ठिकाणी असलेली अतिक्रमणे आजही हटविण्यात आले नाही. अतिक्रमणे काढू नये, यासाठी मोठी आर्थिक तडजोड झाल्याची चर्चा श्रीरामपुरात शहरात नागरीक करीत आहे. श्रीरामपूर शहरातून जाणारा प्रवरा उजवा व डावा कालव्यावरील अतिक्रमणे तात्काळ काढा, प्रवरा कालवा अतिक्रमणमुक्त करा, असा आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी जलसंपदा विभागाला दिला होता, श्रीरामपूर जलसंपदा विभागाने कालवा परिसरात ८.६६ एकर क्षेत्रावरील अतिक्रमणे हटवण्यासाठी २,०७७ अतिक्रमण धारकांना सात दिवसाची तिसरी नोटीस दिली, नोटीस मुदत संपली असतानाही जलसंपदा विभागाने अजून कारवाई केलेली नाही, दोन्ही कालव्याची कचराकुंडी झालेली आहे. नगरपालिकाच त्यासाठी जबाबदार आहे. जलसंपदा मंत्री विखे यांनी कालवा अतिक्रमण मुक्त करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी नागरीक करीत आहेत. कोरोना कालावधीपूर्वी शहरातील नेहरू भाजी मंडई गजबजलेली होती नंतर ही मंडई बंद पडली, शहरातील चौका चौकात व रस्त्यावर भाजी विकणारे लोक बसू लागले, त्यामुळे वाहतूकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे, या ठिकाणी लहान मोठे अपघात होत आहे, नेहरू भाजी मंडई बंद पडल्याने आता या ठिकाणी अवैध व्यवसाय सुरू सुरू आहे, विशेष म्हणजे भाजी मंडई ही शहर पोलीस स्टेशनच्या शेजारी आहे. याबाबत जिल्हा अधिकारी आशिया तसेच पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# तुर्क राजकन्येशी विवाह करणारा ललितादित्य महान




काश्मीरचा इतिहास हा भारताचा इतिहास आहे. भारताने कधी उपखंडाबाहेर आक्रमणे केली नाहीत, विजय मिळवले नाहीत या समजाला खरे तर चंद्रगुप्त मौर्यापासून ते ललितादित्य मुक्तापीडापर्यंत अनेक सम्राटांनी छेद दिलेला आहे, पण त्याबद्दल फारसे बोलले जात नाही. चंद्रगुप्त मौर्याने ग्रीकांचा उपनिवेश असलेल्या अफगाणिस्तान ते बल्खवर आक्रमण करुन विजय तर मिळवलेच पण तेथील ग्रीक प्रशासक सेल्युकस निकेटरच्या हेलन या कन्येशीही विवाह केला आणि एका अर्थाने विवाह संबंधाने ग्रीकांशी नाते जोडले. विजयांची परंपरा कायम ठेवत विवाहसंबंधाने तुर्कांशी राजनैतिक संबंध दृढ करणारा आणि काश्मीरमध्ये आठव्या शतकात उदयाला आलेला भारतातील शेवटचा सम्राट म्हणजे ललितादित्य! ललितादित्याबद्दल कदाचित आपण प्रथमच ऐकत असाल. तसेही आपण इतिहास जतन करण्यात फारच मागास. पण हा ललितादित्य एवढा पराक्रमी सम्राट होता की त्याने अफगाणिस्तान, तुर्कस्तान आणि आज चीनच्या ताब्यात असलेल्या मध्य आशिया (म्हणजे आजचा झिंझियांग परगणा( जिंकत तत्कालीन महासत्ता तिबेटलाही पश्चिमेकडे विस्तार करण्यापासून रोखले. अर्धा भारतही त्याच्या अंमलाखाली आला. सिंध प्रांतात मोहम्मद कासिमचे आक्रमण झाले होते. तो जेंव्हा काश्मीरवरही चालून आला तेव्हा ते परतवण्यात ललितादित्याचा थोरला भाऊ चंद्रापिड यशस्वी झाला. ललितादित्याने सत्तेवर येताच सर्वप्रथम अरबांशी युद्ध छेडले. अरब गव्हर्नर तामिमला नुसते हुसकावून लावून तो थांबला नाही तर त्याचा पाठलाग करत झाबूल (आत्ताच्या अफगाणिस्तानचा भाग) येथे त्याला ठार मारले. तोखारीस्तान (आताचा तुर्कस्तान) येथे तेंव्हा अरब सत्ता गाजवत होते. ललितादित्याने तोखारीस्तानवर आक्रमण करत तेथुनही अरबांना हुसकावून लावले. व्यापारी मार्ग मूक्त केले. विजनवासात गेलेल्या तोर्दू या तुर्क राजाला आपला मांडलिक करत पुन्हा गादीवर बसवले. या उपकाराची फेड करण्यासाठी व राजकीय संबंध घनिष्ठ करण्यासाठी तोर्दूने आपली कन्या इशान ही ललितादित्याला विवाहात दिली. त्यावेळीस तुर्कस्तान हा बौद्ध धर्मीय होता. ललितादित्य हिंदू. पण तत्कालीन सामाजिक वातावरण फार सहिष्णू होते. इशानदेवीने काश्मीरमध्ये आल्यावर विहार तर बांधलेच पण मंदिरेही बांधली. परिहासपुर या ललितादित्याने वसवलेल्या राजधानीत लोकांच्या सोयीसाठी मोठे जलकुंडही निर्माण केले. तिच्यासोबतच आलेला तिच्या भावाचे नाव इशानचंद्र. ललितादित्याने तुर्कस्तानातून चंकूण नावाचा एक सेनानीही आणला. तो त्याच्या दरबारात पुढे अत्यंत प्रतिष्ठेला पोहोचला. चंद्रगुप्त मौर्यानंतर विदेशी संस्कृतीतील लोकांशी सौहार्दमय संबंध जोडण्यासाठी विदेशी पत्नी करणारा ललितादित्य महान हा एकमेव सम्राट. पण दुर्दैवाने तो लोकांना माहितच नाही. अशा सम्राटाचा साद्यंत इतिहास मी ''काश्मीरचा सम्राट ललितादित्य'' या पुस्तकात मांडला आहे. जिज्ञासुंनी तो अवश्य वाचावा आणि तत्कालीन वादळी काळही समजावून घ्यावा. आजचेही आंतरराष्ट्रीय संबंध सुरळीत करण्यासाठी या इतिहासाचा उपयोग होईल याची खात्री आहे. काश्मीर नेहमीच भारताचा अविभाज्य इतिहास राहिलेला आहे याचीही जाणीव यामुळे होईल.



**संजय सोनवणी**
पुणे, महाराष्ट्र
७७२१८७०७६४

**साहित्यवार्ता**

# कोपरगाव रेल्वे स्थानकावर लांबपल्ल्याच्या गाड्यांचे थांबे देण्याची व्यापारी महासंघाची मागणी

## व्यापारी, शेतकरी, साई भक्त, विद्यार्थी आणि स्थानिक प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी पुढाकार

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगावसह परिसरातील नागरिक, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण आणि साईभक्तांना रेल्वे प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर कोपरगाव रेल्वे स्थानकावर अवलंबून राहावे लागते. मात्र सध्या काही महत्त्वाच्या लांबपल्ल्याच्या गाड्यांचे येथे थांबे नसल्यामुळे प्रवाशांना मनमाड, बेलापूर, पुणे आदी ठिकाणी जावे लागते. ही वाढती गैरसोय लक्षात घेता कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने कोपरगाव रेल्वे स्थानकावर पाच लांबपल्ल्याच्या गाड्यांचे थांबे द्यावेत, अशी मागणी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याकडे लेखी स्वरूपात करण्यात आली आहे. ही मागणी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्याध्यक्ष व रेल्वे सल्लागार समिती सदस्य सुधीर डागा यांच्या हस्ते करण्यात आली. त्याचप्रमाणे, ही मागणी असलेले निवेदन कोपरगाव रेल्वे स्थानकप्रमुख भैरव प्रसाद यांच्याकडेही सादर करण्यात आले असून, याची प्रत आमदार आशुतोष काळे यांच्यासह रेल्वे विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आली आहे. कोपरगाव रेल्वे स्थानकावर काकीनाडा एक्सप्रेस, सिकंदराबाद एक्सप्रेस, विजयवाडा एक्सप्रेस, कामायनी एक्सप्रेस आणि पाटलीपुत्र एक्सप्रेस या गाड्यांना थांबा देण्याची मागणी करण्यात आली आहे. कोपरगाव हे शहर सामाजिक, धार्मिक व व्यावसायिकदृष्ट्याही झपाट्याने विकसित होत असून, शिर्डीपासून अवघ्या १५ किमी अंतरावर असल्याने वर्षभर साईभक्तांची मोठी गर्दी येथे पाहायला मिळते. तसेच, परिसरातील व्यापारी, शेतकरी व विद्यार्थी दररोज रेल्वेने प्रवास करतात. अशा वेळी कोपरगावसारख्या महत्त्वाच्या स्थानकावर वरील गाड्यांचे थांबे नसणे ही दुर्दैवी बाब असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या मागणीस श्री साईबाबा संस्थानचे प्रतिनिधी, कोपरगावच्या विविध व्यापारी संघटना, रिक्षा संघटना आणि नागरिकांनीही जोरदार पाठिंबा दिला आहे. व्यापारी महासंघ आणि रेल्वे सल्लागार समितीच्या वतीने सांगण्यात आले की, या मागणीस राजकीय पाठबळही देण्यात येणार असून, खासदार, आमदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत लवकर निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. ''रेल्वे प्रशासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष घालून कोपरगाव स्थानकावर लांबपल्ल्याच्या गाड्यांचे थांबे निश्चित करावेत, ही कोपरगावकरांची सामूहिक अपेक्षा आहे,'' असे सुधीर डागा यांनी यावेळी स्पष्ट केले.





# गोहत्येविरोधात जनआक्रोश

## गोरक्षकांवरील हल्ल्यांचा निषेध

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी शहरात गोहत्येविरोधात आणि गोरक्षकांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने जनआक्रोश मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील विविध हिंदू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले. अजंठा चौक येथे झालेल्या या सभेला शहर बंदचेही उस्फुर्त समर्थन मिळाले. या मेळाव्यात गोरक्षक भारत लिपारे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. तसेच तिसगाव परिसरात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर कत्तलखान्यांविरोधात कार्यवाहीची मागणी करण्यात आली. या प्रसंगी आमदार गोपीचंद पडळकर, आमदार मोनिका राजळे, आमदार संग्राम जगताप, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले, श्रीराम संघाचे सागर बेग आदी मान्यवर उपस्थित होते. महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांच्या अध्यक्षतेखाली मेळाव्याचे आयोजन झाले. आ. पडळकर आणि आ. राजळे यांनी आपल्या भाषणात गोरक्षकांवरील हल्ल्यांची गंभीर दखल घेतली. गोहत्येविरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी, बेकायदेशीर कत्तलखाने बंद करावेत, आणि गोरक्षकांना संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली. आ. राजळे यांनी आपल्या भाषणात प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ''हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात,'' अशी मागणी केली. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. नामदेव जायभाय, मुकुंद गर्जे आणि अमोल गर्जे यांनी योगदान दिले. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी पोलीस ठाण्याने मोठा बंदोबस्त ठेवून कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी सक्षमपणे निभावली.

# दुसऱ्या दिवशीही वादळासह पावसाची हजेरी

## विजपुरवठा खंडित, झाडे कोसळले



**नेवासा । विजय खंडागळे**

शनिशिंगणापूर, सोनई, धनगरवाडी, शिरेगाव, बेल्हेकरवाडी, मोरया चिंचोरे, हिंगोणी, कांगोणी, खेडले परमानंद व पानसवाडी परिसरात काल (बुधवार) सायंकाळी दुसऱ्या दिवशी सलग वादळासह जोरदार पावसाने हजेरी लावली. रात्री आठच्या सुमारास आलेल्या या पावसामुळे अनेक भागांत विजेचा पुरवठा खंडित झाला, तर मोठ्या झाडांच्या आणि विद्युत पोल्सच्या कोसळण्याने वाहतुकीवरही परिणाम झाला.

वादळामुळे काही भागांत कांदा चाळींचे नुकसान झाले असून काही घरांच्या छप्परांची पडझड झाली. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटून पडल्या होत्या. डीपीचे पोलही काही ठिकाणी कोसळले. झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. तातडीने जेसीबीच्या सहाय्याने अडथळे दूर करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या वादळाचा नागरिकांनी पहिल्यांदाच इतका तीव्र अनुभव घेतला. वादळासह आलेल्या पावसात विजेच्या कडकडाटासह ढगांचा प्रचंड आवाज दचकवणारा ठरला. काही वाहनांवर झाडे कोसळल्याचेही निदर्शनास आले. स्थानिक प्रशासनातील तलाठी व ग्रामसेवकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात पाहणी करून नागरिकांना आवश्यक सूचना दिल्या. गेल्या काही दिवसांपासून प्रचंड उकाडा आणि दमट हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले होते. त्यामुळे या पावसाने काहीसा दिलासा दिला असला, तरी झालेल्या नुकसानीमुळे चिंता वाढली आहे. यंदा पहिल्यांदाच २४ तास सलग कूलर व फॅनचा वापर वाढल्याचीही नागरिकांनी प्रतिक्रिया दिली.



# कृषी सहाय्यक पी.टी. कुसळकर यांना राज्यस्तरीय कृषिभूषण पुरस्कार

**नेवासा । विजय खंडागळे**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पातील कृषी सहाय्यक पी. टी. कुसळकर यांना गरुड फाउंडेशन व युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय कृषिभूषण पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. राहुरी येथील अण्णासाहेब शिंदे सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण समारंभात पोलीस आयुक्त मा. संदीप भांड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी खासदार मा. निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, रावसाहेब खेवरे, गरुड फाउंडेशनचे अध्यक्ष आकाश पुजारी, पत्रकार रमेश खेमनर, विजय तमनर, बाळकृष्ण भोसले, ज्ञानेश्वर बाचकर, जावेद शेख, सोमनाथ वाघ, आर. आर. जाधव व सुनील कोकरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. कुसळकर यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील कृषी संशोधन केंद्रात १२ वर्ष सेवा बजावताना 'चवळी' पिकावर महत्वपूर्ण संशोधन केले असून 'फुले पंढरी', 'फुले विठाई', 'फुले रखुमाई' व 'फुले सोनाली' हे चार नवीन वाण विकसित करण्यात मोलाचे योगदान दिले आहे. याशिवाय, सोयाबीन, हरभरा आणि चवळी या पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी बियाणे निर्मिती व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कुसळकर यांनी शेतकऱ्यांसाठी चवळी व भुईमूग लागवडीवरील अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील माहिती लेखांच्या माध्यमातून पोहोचवली आहे. सध्या ते कापूस सुधार प्रकल्प, म. फु. कृ. वि., राहुरी येथे कीटकशास्त्र विभागात कार्यरत आहेत. प्रकल्पातील शेततळ्याचे नियोजन, पाणी व्यवस्थापन आणि कापूस आध्यरेखा प्रात्यक्षिकांद्वारे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. कृषी क्षेत्रातील कार्यासोबतच त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातही भरीव कार्य केले आहे. तसेच, कृषी सहाय्यक संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील कृषी सहाय्यक केडरच्या समस्या शासनदरबारी मांडून त्यांच्या सोडवणुकीसाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. या गौरवप्रसंगी कृषी, संशोधन, पोलीस, पत्रकार, वैद्यकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह कुसळकर यांचे सहकारी व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री शंकरराव गडाख आणि पंचायत समितीच्या माजी सभापती सुनिताताई गडाख यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करणार- ताडे

## ट्रस्ट मालमत्तेचा बेकायदेशीर दस्त

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

श्रीगोंदा शहरातील गट नं. ११२१ (जुना गट नं. ११००, स.नं. १२०७) क्षेत्र ०.५८ हेक्टर ही मालमत्ता श्रीराम पठार ट्रस्टच्या मालकीची असून, ती कोणत्याही एकट्या व्यक्तीच्या खाजगी मालकीची नाही, असा दावा ट्रस्टचे सदस्य नंदकुमार ताडे यांनी पत्रकार परिषदेत केला. सदर मालमत्ता धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे नोंदणी क्रमांक ५६३ (ऐ/६४०) अंतर्गत नोंदणीकृत असून, श्रीगोंदा नगरपरिषदेच्या विकास आराखड्यात आरक्षण क्रमांक ३३ नुसार बाजारतळ व शॉपिंग सेंटरसाठी आरक्षित आहे. ताडे यांनी आरोप केला की, चंद्रनंदन सारंग ताडे यांनी २ जानेवारी २०२५ रोजी बापू बाबा माने यांच्यावतीने एक मुखत्यारपत्र नोंदवून दिले, ज्यामध्ये कोणत्याही विशिष्ट क्षेत्राचा उल्लेख नसतानाही आठ आणे हिस्सा असा अस्पष्ट उल्लेख केला होता. त्याच आधारे बापू माने यांनी १६ एप्रिल २०२५ रोजी मालमत्तेचे खरेदीखत स.ग.द.नं. २६६०/२०२५ नुसार नोंदणी करून घेतले. या दस्तांमध्ये संदिप दिलीप उमाप व रमेश बबन मखरे हे साक्षीदार आहेत. तथापि, सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर चंद्रनंदन ताडे यांचे नाव पोकळीस्त असल्याचे स्पष्ट असून, त्यांना वरील मालमत्तेबाबत कोणताही वैधानिक अधिकार नसल्याचे ताडे यांनी सांगितले. सदर मालमत्ता श्रीराम मंदिर ट्रस्टच्या मालकीची असून, तिची नोंद पुणे येथील धर्मादाय आयुक्त कार्यालयातही आहे. त्यामुळे खाजगी दस्त करून ही ट्रस्ट मालमत्ता बेकायदेशीरपणे विक्रीस काढल्याचे प्रकार फौजदारी गुन्ह्यास पात्र असल्याचे ताडे यांनी म्हटले. या प्रकारास जबाबदार म्हणून त्यांनी चंद्रनंदन ताडे, बापू माने, संदिप उमाप व रमेश मखरे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. याबाबत सर्व कागदपत्रे व पुरावे दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथे सादर केल्याचेही त्यांनी सांगितले.

**'राम मंदिराची जागा वाचवण्यासाठीच उचलले पाऊल'**

'बापू माने याच्यावर आधीपासून गुन्हे दाखल असून तो घरांना आग लावण्याचे काम करतो. मी मंदिरासाठीच लेटरपॅडचा वापर केला आहे, गैरवापर केला नाही. फटाके विक्रेत्यांकडून कोणतेही भाडे घेत नाही. ही जागा राम मंदिराचीच आहे आणि तीच राहील. माझ्या जीवाला काही झाले, तर त्यास बापू माने जबाबदार असेल. **नंदकुमार ताडे**